# दादापाटील राजळे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

आदिनाथनगर, ता. पाथर्डी, जि.अहमदनगर (c-२०)

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबीर

**मढी**

**सन २०१९—२०**

**अहवाल**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे व दादापाटील राजळे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आदिनाथनगर, पाथर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबिर बुधवार दिनांक १८ डिसेंबर २०१९ ते २४ डिसेंबर २०१९ या कालावधीत मढी या ठिकाणी यशस्वीपणे संपन्न झाले. पहिल्या दिवशी बुधवार दिनांक १८/१२/२०१९ शिबिराच्या ठिकाणी विद्यार्थ्यांचे प्रयान झाले त्यादिवशी दररोज लागणाऱ्या साहित्याची व्यवस्था व शिबिराचे कालबद्ध नियोजन करण्यात आले. तसेच परिसर स्वच्छता व ग्राम स्वच्छता करण्यात आली. बुधवार दिनांक १९/१२/२०१९ या दिवशी शिबिराचे उद्‍घाटन माननीय श्री राहुल दादा राजाळे विश्वस्त, श्री दादापाटील राजळे शिक्षण संस्था यांच्या हस्ते व माननीय श्री सुधीर भाऊराव मरकड सचिव श्री मढी देवस्थान ट्रस्ट यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री राहुलदादा राजळे म्हणाले पर्जन्यमानाच्या अनियमिततेमुळे पाणी प्रश्न भविष्यात गंभीर स्वरूप धारण करीत आहे. राष्ट्रीय सेवा योजना माध्यमातून विद्यार्थ्यांनी जलसंधारण, पर्यावरण संवर्धन बरोबरच शाश्वत आर्थिक विकासासाठी जनजागृती करावी. पाणी प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे असे ते म्हणाले. त्याचबरोबर वाचन संस्कृती वाढविणे आवश्यक आहे. त्यातून ज्ञानप्रसार होऊन सामाजिक व आर्थिक समस्या सोडवण्यास मदत होईल असे मार्गदर्शन स्वयंसेवकांना केले. याप्रसंगी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना माननीय श्री पांडुरंग खेडकर संचालक, वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना लिमिटेड आदिनाथनगर म्हणाले की महात्मा गांधीजींचे ग्रामीण विकासाबद्दल विचार लोकांच्या अंगी असणे गरजेचे आहे. हिंदू संस्कृती मधील ज्ञान—विज्ञान महत्त्वाचे आहे असे त्यानी सांगितले. राष्ट्रीय सेवा योजना शिबिर हे बिनभिंतीची शाळा आहे. गावातील संस्कृती समाजरचना विचार यांचे ज्ञान अवगत करावे व अद्यावत आधुनिक ज्ञानाची ग्रामस्थांशी देवाण—घेवाण करून समाजाच्या सक्षमीकरणासाठी मदत करावी असे मार्गदर्शन केले. या प्रसंगी माननीय श्री उद्धव संचालक, वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना लिमिटेड आदिनाथनगर या शिबिरातून विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कार रुजावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच माननीय श्री रामकिसन काकडे यांनी विद्यार्थ्यांना शिबीरासाठी शुभेच्छा दिल्या. माननीय श्री आण्णासाहेब मरकड अध्यक्ष श्री क्षेत्र मढी देवस्थान ट्रस्ट यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात राष्ट्रीय सेवा योजना शिबिर हे एक निस्वार्थी सेवेची संधी आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना श्रमदानाबरोबरच गावाची ऐतिहासीक पार्श्वभुमी, औषधी वनस्पती सर्वेक्षण करावे असे आव्हान केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर कार्यक्रम आधिकारी प्रा आसाराम देसाई यांनी मानले. सूत्रसंचालन

स्वयंसेविका कुमारी स्वाती काळे यांनी केले. दुपारच्या सत्रात माननीय श्री राजेश सुरवसे झी मराठी हास्यसम्राट यांनी आनंदी जीवन या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हासल्याने माणसाच्या आरोग्य निरोगी राहते व आयुष्यमान वाढते असे त्यांनी सांगितले. त्यांनी सुखी जीवनाचा मंत्र आपल्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना सांगितला. दिनांक २० डिसेंबर २०१९ शुक्रवार शिबीराचा तिसरा दिवस ग्रामपंचायत परिसराची व तेथील मंदिराच्या परिसराची स्वच्छता केली तसेच स्मशानभूमीची स्वच्छता केली. दुपारच्या सत्रात प्रा. संभाजी मरकड डॉक्टर अण्णासाहेब शिंदे कृषी तंत्रनिकेतन आदिनाथ नगर यांनी कृषी व आजचा युवक या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला त्यांनी शेतीक्षेत्रात युवकांना असलेल्या विविध संधी, आधुनिक तंत्रज्ञानयुक्त शेती याविषयी मार्गदर्शन केले. दिनांक २१ डिसेंबर २०१९ शनिवार शिबीराचा चौथा दिवस या दिवशी सी सी टी खोदायचे काम विद्यार्थ्यांनी केले. तसेच मढी देवस्थानच्या सार्वजनिक वाचनालयाचा परिसर स्वच्छ केला. दुपारच्या सत्रात माननीय डॉक्टर संदीप कांबळे समुपदेशक, उपजिल्हा रुग्णालय पाथर्डी यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य व आहार या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. आहारात कोणत्या घटकांचा व जीवनसत्त्वांचा समावेश असावा याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्याबरोबर आलेले डॉक्टर भोईटे यांनी विद्यार्थ्यांच्या विविध प्रकारच्या टेस्ट घेतल्या व आरोग्य तपासणी केली. दिनांक २२ डिसेंबर २०१९ रविवार शिबिराचा पाचवा दिवस या दिवशी देखील वनराई बंधाऱ्याचे काम व सिटीटी खोदाई केली. तसेच परिसर स्वच्छता अशी अनेक कामे विद्यार्थ्यांनी केली. नंतर भोजन करून दुपारच्या सत्रात माननीय श्री संदीप काळे यांनी काव्य व सामाजिक जीवन या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना काव्यप्रकार समजून सांगितले सांगितले. सामाजिक जाणीवेची जाणीव करून दिली. सोमवार दिनांक २३ डिसेंबर २०१९ त्यादिवशी फुलबाग येथील वनराई बंधाऱ्याची निर्मिती विद्यार्थ्यांनी केली. तसेच गावातील वस्तीवर घरोघरी जाऊन स्वच्छतेचे महत्त्व महिलांना पटवून दिले. कुटुंबाशी संवाद साधताना कुटुंबात असणाऱ्या सामाजिक समस्या तसेच त्यांना उद्भवणारे अनेक प्रश्न, गावाची संस्कृती याविषयी माहिती घेतली. नंतर दुपारच्या सत्रात डॉक्टर राजकुमार घुले यांनी अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी कृतीयुक्त काही प्रयोग करून मुलाच्या मनात येईल अंधश्रद्धेवरची भीती एकदम घालवली. यादिवसाचे कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी सरपंच देविदास मरकड यांनी देखील विद्यार्थ्यांचे बंधाऱ्याच्या तसेच अनेक कामाबद्दल अभिनंदन करताना अंधश्रद्धा याची काही उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना त्या पासून दूर राहण्याचे सांगितले. दिनांक २४ डिसेंबर २०१९ शिबिरात शेवटचा दिवस यादिवशी सेवकांनी ग्रामस्वच्छता केली. व शिबिराचा समारोप माननीय आमदार मोनिकाताई राजळे शेवगाव—पाथर्डी विधानसभा मतदार संघ यांच्या प्रमुख उपस्थितीत व माननीय श्री अण्णासाहेब मरकड श्री कानिफनाथ देवस्थान ट्रस्ट मढी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. याप्रसंगी बोलताना माननीय आमदार मोनिकाताई राजळे म्हणाल्या जीवनात उच्च ध्येयप्राप्तीसाठी केवळ शैक्षणिक प्रगती आवश्यक नाही तर त्यासोबत सामाजिक क्षेत्रातील प्रगती सुद्धा उपयोगी ठरते. यासाठी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना सारख्या शिबीराची गरज असुन विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यात शिबिरातील संस्कार उपयोगी पडतात. राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात विद्यार्थ्यांना मिळालेल्या शिदोरीचा भविष्यात उच्च ध्येय गाठण्यासाठी निश्चित उपयोग होईल. शिबीरामुळे जीवनामध्ये व्यवहारीकपणा, सामाजिक बांधिलकी याची जाणीव निर्माण होते. आजची युवा पिढी मोबाईल, फेसबूक, व्हाट्सॲप या सोशल मीडिया मध्ये हरवली आहे. मात्र, एनएसएसच्या श्रमदान, संस्कारात एकजुटीने हे सर्व विसरुन सामाजिक समस्याचे भान, श्रमनिष्ठा, राष्ट्रनिष्ठ हा संकल्प घेऊन सर्व विद्यार्थी या शिबिरात मढी येथे श्रमदान केले. या सात दिवसात विद्यार्थ्यांनी केलेल्या

स्वच्छतेत ग्रामस्थांनी सातत्य ठेवायचे आव्हान राजळे यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी स्वयंसेवक शिंदे व ऋषिकेश आंधळे यांनी शिबिरातील आपले अनुभव कथन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर आर. जे. टेमकर यांनी केले. तर आभार डॉ. साधना म्हस्के यांनी मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वयंसेविका कचरे हिने केल. शिबीराचे यशस्वी आयोजनासाठी कार्यक्रम आधिकारी प्रा. आसाराम देसाई, डॉ. साधना म्हस्के, प्रा. असलम शेख प्रा. अर्चना दरंदले यांनी परिश्रम घेतले.

प्रा. ए. एच देसाई<br>डॉ. एस. डी. म्हस्के<br>कार्यक्रम अधिकारी

डॉ. आर. जे. टेमकर<br>प्राचार्य